**ठळक बातम्या**

- अदानी लाचखोरी, संभल हिंसाचार आणि इतर मुद्द्यांवरुन विरोधकांचा संसदेत गदारोळ/ दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- राज्य विधानसभा निवडणुकीत मतदान यंत्रांत छेडछाड झाल्याचे खोटे दावे करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांवर कठोर कारवाई करण्याचा मुख्य  निवडणूक अधिकाऱ्यांचा इशारा

- नोव्हेंबर २०२४मधे वस्तू आणि सेवा कर संकलनात साडेआठ टक्के वाढ

- उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्या मुंबई दौऱ्यावर

**आणि**

- येत्या दहा वर्षांत भारतीय नौदलात आणखी  ९६ जहाजं आणि पाणबुड्या दाखल होणार

**<><><><><>**

अदानी समूहाचं कथित लाचखोरी प्रकरण आणि संभलमधल्या हिंसाचारासह विविध मुद्द्यांवरून आजही दोन्ही सभागृहात गदारोळ झाल्यामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

लोकसभेत सकाळी कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधकांनी अदानी, संभल आणि मणिपूर या मुद्द्यांवर चर्चेची मागणी केली. सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास सुरू केल्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी करायला सुरुवात केली.

गोंधळ सुरूच राहिल्याने सभापतींनी कामकाज आधी दुपारी बारा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं.

राज्यसभेतही याच मुद्द्यांवरून विरोधकांनी दिलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळला. त्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी केल्यामुळे राज्यसभेतही गदारोळ सुरू झाला. अध्यक्षांनी चर्चा करण्याची विनंती करूनही गोंधळ सुरूच राहिल्याने त्यांनी सभागृहाचं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं.

**<><><><><>**

संसदेत घोषणाबाजी करून कामकाजात अडथळे आणल्याबद्दल केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांनी विरोधकांवर टीका केली आहे. अशा प्रकारची अडवणूक म्हणजे जनतेच्या पैशाची उधळपट्टी असल्याचा आरोपही सिंह यांनी केला आहे. संसद सदनाबाहेर ते माध्यमांशी बोलत होते. दरम्यान, अदानी प्रकरणासह विविध मुद्यांवर विरोधकांनी केलेले स्थगन प्रस्ताव सरकारने स्वीकारले नाहीत. कारण केंद्राला या मुद्द्यांवर चर्चा करायची नसल्याचा प्रत्यारोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मनिष तिवारी यांनी केला आहे.

**<><><><><>**

कौशल्याधारित उद्योगांसाठी देशभरात २०२ उत्कृष्टता केंद्र सुरु करण्यात आल्याची माहिती केंद्रीय कौशल्यविकास आणि उद्योजकता मंत्री जयंत चौधरी यांनी दिली आहे. लोकसभेत आज ते एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देत होते. हस्तकलांवर आधारित उद्योगांना अधिक विस्तृत बाजारपेठ मिळवून देणं आणि त्या कौशल्यांचं प्रशिक्षण देणाऱ्या संस्था तयार करणं या उद्देशाने ही केंद्र स्थापन केल्याचं त्यांनी सांगितलं. पर्यावरण पूरक उद्योगांमधून रोजगारनिर्मितीसाठी एक क्षेत्र समर्पित असून प्रधानमंत्री सूर्य घर योजनेमार्फत एक लाख रोजगार निर्मितीचं उद्दिष्ट आहे असं ते म्हणाले.

**<><><><>**

महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम अर्थात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे खोटे दावे करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, एस. चोकलिंगम यांनी दिला आहे. ईव्हीएम गैरव्यवहारांबद्दल महाराष्ट्र विकास आघाडीच्या नेत्यांकडून सतत आरोप केले जात आहेत, त्याचवेळी चोकलिंगम यांनी हे विधान केलं आहे. या प्रकरणी अधिकारी सखोल तपास करत आहेत, असंही त्यांनी नमूद केलं. परदेशात वास्तव्यास असलेल्या आणि ईव्हीएममध्ये घोटाळा झाल्याचा आरोप करणारी पत्रं पाठवणाऱ्या सय्यद शुजा यांच्या विरोधात निवडणूक आयोगानं गुन्हा दाखल केला आहे, असंही चोकलिंगम यांनी स्पष्ट केलं.

**<><><><>**

महाराष्ट्रात सरकारस्थापनेच्या दृष्टीनं महायुतीच्या घटक पक्षांमधे आजपासून वाटाघाटी पुन्हा सुरु होतील. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रकृती अस्वास्थ्यामुळे विश्रांतीकरता गावी गेले होते, ते परतले असून आता आपली प्रकृती ठीक असून मुख्यमंत्रीपदाचा निर्णय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा घेतील, असं काल त्यांनी प्रसारमाध्यमांना सांगितलं.

भारतीय जनता पार्टीच्या विधिमंडळ पक्षाची बैठक झाल्यानंतर मुख्यमंत्रीपदासाठी औपचारिक घोषणा होण्याची शक्यता आहे.

दरम्यान शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांना उपमुख्यमंत्रिपद मिळणार असल्याचं वृत्त निराधार असल्याचं स्वतः श्रीकांत शिंदे यांनी समाजमाध्यमावर संदेश लिहून स्पष्ट केलं आहे. यापूर्वी आपल्याला केंद्रात मंत्रिपदाचा प्रस्ताव मिळाला होता मात्र आपण तो नाकारला. पक्षसंघटना आणि लोकसभा मतदार

संघावर लक्ष केंद्रीत करणार असून राज्यातल्या कोणत्याही मंत्रिपदात आपल्याला रस नाही, असं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

राज्यात विधीमंडळ पक्षनेत्याच्या नेमणुकीसाठी भाजपाच्या संसदीय मंडळाने दोन निरीक्षकांची नेमणूक केली आहे. यात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचा समावेश आहे.

<><><><><>

देशात नोव्हेंबरमध्ये वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटी संकलन १ लाख ८२ हजार कोटी रुपये झालं आहे. गेल्या वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत त्यात साडेआठ टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये एकूण १लाख ६८ हजार कोटी रुपये जीएसटी जमा झाला होता. सरकारनं काल ही आकडेवारी जाहीर केली. यंदाच्या नोव्हेंबरमध्ये जमा झालेल्या एकूण जीएसटी मध्ये केंद्रीय जीएसटी संकलन ३४ हजार १४१कोटी रुपये, राज्य जीएसटी ४३ हजार ४७ कोटी रुपये, एकात्मिक जीएसटी ९१ हजार ८२८ कोटी रुपये तर उपकर १३ हजार २५३ कोटी रुपये आहे.

<><><><><>

देशातल्या कोळसा खाणींमधून गेल्या ८ महिन्यांत ११ कोटी २० लाख टन इतकं उत्पादन झाल्याची माहिती केंद्रीय कोळसा मंत्रालयानं दिली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत झालेल्या उत्पादनाच्या तुलनेत यंदा ३५ टक्क्यांची वाढ झाली आहे. नोव्हेंबर महिन्यात त्यात आणखी १ कोटी ७० लाख टन कोळशाची भर पडली आहे. देशांतर्गत उर्जा निर्मितीला प्राधान्य देऊन सरकार भारताला पायाभूत सुविधांच्या विकासाच्या दृष्टीने पुढे घेऊन जात असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातल्या विकसित भारत २०४७ मधलं ते पुढचं पाऊल आहे, असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्या मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या शतकमहोत्सवी समारंभाला ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते शतकमहोत्सवी स्तंभाचं उद्घाटन होईल. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान हेदेखील या कार्यक्रमाला संबोधित करतील. संस्थेच्या शतकमहोत्सवी वर्षाचं औचित्य साधून ‘अमृतकाळात कापसावरची उत्पादनानंतरची प्रक्रिया’ या विषयावरच्या परिसंवादाचं आयोजनही करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

नवी मुंबई महानगरपालिकेनं २०२४-२५ या वर्षासाठी धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण केलं आहे. सर्वेक्षणानंतर ५२७ इमारती धोकादायक इमारती म्हणून घोषित केल्या आहेत. या इमारतींचा वापर तात्काळ थांबवण्यात यावा असं आवाहन पालिकेनं केलं आहे. तसंच ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी असलेल्या इमारतींचं संरचना परिक्षण महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून किंवा संरचना अभियंत्याकडून करून घेणं अनिवार्य केलं आहे.

**<><><><><>**

येत्या दहा वर्षांत भारतीय नौदलात ९६ जहाज आणि पाणबुड्या सामील केल्या जातील असं नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी यांनी सांगितलं. ६२ जहाजं आणि एक पाणबुडी निर्माणाधिन असून पुढच्या वर्षापर्यंत प्रत्येक महिन्यात एक जहाज नौदलात सामील करून घेतलं जाईल असं त्रिपाठी म्हणाले. वार्षिक नौदल दिवसाच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर ते आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. ४ डिसेंबर रोजी ओदिशातल्या पुरी इथं नौदल दिवस साजरा केला जाईल. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती असेल, असं त्यांनी

सांगितलं. भारत  हा शेजारी देशांपासून होणाऱ्या संभाव्य धोक्याला तोंड देण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे, असंही त्यांनी यावेळी  सांगितलं.

**<><><><><>**

इयत्ता पाचवी आणि आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये ९ फेब्रुवारी या एकाच दिवशी पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी शाळा नोंदणी आणि विद्यार्थी ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी १७ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यात वाढ करण्यात आली असून विद्यार्थ्यांना आता विलंब शुल्क, अतिविलंब शुल्क आणि अति विशेष विलंब शुल्कासह ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज भरता येणार असल्याचं राज्य परीक्षा परिषदेनं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात सांगण्यात आलं आहे.

**<><><><><>**

जागतिक एड्स दिनानिमित्त राज्यात विविध ठिकाणी काल आणि आज अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**हिंगोलीत** यानिमित्त आज जिल्हा सामान्य रुग्णालय आणि शासकीय परिचारिका प्रशिक्षण केंद्रानं जनजागृती काढली. हिंगोलीच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी या रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. उपस्थितांना या कार्यक्रमात एड्स नियंत्रणाबाबत शपथ देण्यात आली. तर शहरातल्या गांधी चौकात प्रतीकात्मक मानवी साखळी तयार करून एड्स नियंत्रणाबाबत माहिती देण्यात आली.

**मुंबईत** एच आय व्ही संसर्ग झालेल्या मुलांना आनंदाचे काही क्षण घालवता यावेत या उद्देशानं काल जिल्हा एड्स संस्थेनं आनंद मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात  मुलांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तर जगाची सफर या कार्यक्रमात माहिती आणि मनोरंजनातून या मुलांना विविध देशांची सफर घडवण्यात आली.

**<><><><><>**

भंडारा - तुमसर महामार्गावर मोहाडी परिसरातल्या एमआयडीसी जवळ अतिवेगानं जाणारी दुचाकी घसरल्यानं झालेल्या अपघातात एका युवकाचा मृत्यू झाला असून एक जण जखमी झाला आहे. मृत तरुण तिरोडा तालुक्यातल्या मुंडीकोटा इथला तर जखमी तरुण तिरोडयातला आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिनानिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम होत आहेत. भोपाळमधे झालेल्या युनियन कार्बाईड विषारी वायू दुर्घटनेत मरण पावलेल्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी २ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस म्हणून पाळला जातो. ही दुर्घटना ३ डिसेंबर १९८४ रोजी घडली होती.

**//<><><><><>//**